राष्ट्रीय आरोग्य अभियान
जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, सांगली
रजि. नं. महाराष्ट्र/९८९/२००५, सांगली

राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

पत्ता, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सांगली
फोन नं. :- ०२३३ - २३७३०३२
०२३३ - २३७३०६२
फॅक्स नं.:- ०२३३ - २३७४४६२
Email Address :- dpmsangli.nrhm1@gmail.com

जा.क्र./आरोग्य/NHM/कोटेशन/५७/२६
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सांगली
दिनांक :- ०५/०४/२०२६.

**विषय :- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा व्यवस्थापन कक्षासाठी(DPMU) मासिक भाडेतत्वावर वाहन पुरवठा बाबात दरपत्रके मागविणेबाबत......**

वरील विषयास अनुसरुन राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा व्यवस्थापन कक्षासाठी अधिकारी कर्मचारी यांचे क्षेत्रिय भेटीसाठी मासिक वाहन भाडे तत्वावर मारुती इरटिका/तवेरा/स्वीफट डिझायर/इटिऑस अगर तत्सम स्वरुपाचे वाहन आवश्यक आहे.

तरी सदर वाहनाचा पुरवठा करणेबाबत सोबत जोडलेल्या अटी व शर्तीचे अधिन राहून आपणाकडून दरपत्रके मागविणेत येत आहेत. सदर दरपत्रके बंद लखोटयातून दि.१३/०५/२०२६ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, सांगली यांचे नावे स्विकारणेत येतील दरपत्रके मंजूरीचे अंतिम अधिकार मा.जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद सांगली यांचेकडे राहतील.

**तक्ता क्र.१**

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | आवश्यक वाहने | अंदाजे वाहन फिरती. |
|---|---|---|---|
| १ | मारुती इरटिका/तवेरा/स्वीफट डिझायर/इटिऑस अगर तत्सम स्वरुपाचे वाहन | १ वाहन | दरमहा २५०० कि.मी. |

दरपत्रके २ लिफाफा पदधतीने यावीत लखोटा क्र.१(कागदपत्रे) लखोटा क्र.२ सोबत दरपत्रके मागणी सविस्तर नियम अटी व शर्ती

**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद सांगली तथा सदस्य सचिव,**
जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, सांगली

Scanned with OKEN Scanner

# • मासिक भाडे तत्वावरील वाहन – अटी व शर्ती •

१) वाहनाच्या भाडयाचे दर करारनाम्याच्या दिनांकापासून दि. / /२०२६ ते दि. / / या कालावधी करीता मान्य राहतील.
या कालावधीमध्ये दरात कोणत्याही कारणास्तव बदल होणार नाही.

२) पुरवठा केले जाणारे वाहन जानेवारी, २०१९ नंतरच्या बनावटीचे असावे. जानेवारी,२०२२ नंतरच्या बनावटीचे वाहनास प्राधान्य दिले जाईल.

३) मोटार वाहन कायदा सन १९८८ मधील तरतूदी प्रमाणे वाहनाची सर्व प्रमाणपत्रे वैध असावीत.

४) वाहनाचा केंद्रीय मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या तरतूदीनुसार परिवहन संवर्गातील म्हणजेच प्रवासी वाहतूक परवाना कागदपत्रे वैध असणे आवश्यक आहे.

५) मुंबई मोटार वाहन कायदयाप्रमाणे वाहनाच्या सर्व प्रकारच्या कराची रक्कम भरलेली असावी.

६) वाहनाचा थर्डपार्टीसह पूर्ण विमा कायम उतरविलेला असावा.

७) वाहन पुरवठा धारकाने नियमानूसार वेळोवेळी पी.यु.सी.वैध प्रमाणपत्र सादर करावे.

८) वाहनाचा सर्व कर भरणा केला असलेबाबत व आवश्यक परवाने अद्ययावत असलेबाबतचे संबंधित कागदपत्रे नेहमी वाहन चालका सोबत असणे आवश्यक आहे.

९) वाहन चालकाजवळ वाहन चालविण्यासाठी प्रचलित कायदयानूसार वैध अनुज्ञप्ती असावी.

१०) कार्यालयाने मागणी केलेस, वाहन चालकांच्या एकंदरीत वर्तणूक व चारित्र्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करुन देण्याची जबाबदारी वाहन मालकावर राहील.

११) वाहन २४ (चोवीस) तास कार्यालयासाठी असेल त्यासाठी वाहन चालकाला कोणताही अतिरीक्त भत्ता तसेच चहा/नाष्टा/जेवण दिले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१२) वाहन पुरवठा दाराने अटी व शर्ती प्रमाणे वाहन न पुरविण्यास, किंवा त्या नंतर अन्य कोणत्याही अटी अथवा शर्तीचा भंग केल्यास संबंधित वाहन धारकास सात दिवसाची पूर्व सूचना देवून करार रद्द करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, सांगली यांनी राखून ठेवला आहे. वाहन कर्तव्यावर असताना नादुरुस्त/खराब झालयास त्वरीत बदली वाहन पूरविण्याचे व्यवस्था वाहन पुरवठादारांनी करावी लागेल.

१३) वाहन पुरवठादाराने निर्धारीत केलेल्या कर्तव्यासाठी वाहनाचा पुरवठा न केल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी निंधारीत करतील तो दंड अधिक वाहन बाजारातून भाडयाने घेण्यात येईल व त्यास जादा भाडे दयावे लागल्यास अश्या जादा भाडयाची वसूली वाहन पुरवठादाराकडून वसूल करण्यात येईल.

१४) कार्यालयीन परवानगी शिवाय वाहन खाजगीरीत्या वापरता येणार नाही. जर अनधिकृतपणे खाजगी प्रवासी वाहतूक करण्यासाठी वाहनाचा वापर केला जात आहे असे निर्देशनास आलेस सदरचा करार रद्द करण्यात येईल व पुनःश्च करारापर्यंतच्या कार्यवाहीचा सर्व येणारा खर्च वाहन पुरवठादार यांचेकडून वसुल करणेस पात्र राहील.

१५) वाहन वापराबाबतची दैनंदीन अधिकृत माहिती कार्यालयीन सूचनेनूसार (उदा. दिनांक, फिरतीचे ठिकाण, वेळ, वापर, कि.मी. इ.) लॉगबुक नियमितपणे कार्यालयास लेखी सादर करणे अनिवार्य राहील.

१६) वाहन कर्तव्यावर असताना अपघात झाल्यास व वाहनातील प्रवाशास इजा, दुखापत, मृत्यू झालेस किंवा त्या अनुषगाने होणारा सर्व खर्च/नुकसान भरपाई वाहन पुरवठादाराने देणे बंधनकारक राहील.

१७) वाहन भाडयाच्या देयकाच्या रक्कमेतून नियमानूसार अनुज्ञेत होणारा आयकर व त्यावरील अधिभार आहरण व संवितरण अधिकारी (Drawing and Disnursing Officer) यांचे स्तरावरुन वसूल केला जाईल.

Scanned with OKEN Scanner

१८ )वाहन सुस्थितीत असलेबाबतचे अधिकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. कराराच्या दरम्यानच्या काळात वाहनाच्या भागांची (टायर, ल्यूब्रिकेटस, डिझेल) किंमतीत वाढ झाल्यास कुठल्याही प्रकारे दर वाढवले जाणार नाहीत / तशी मागणीही करता येणार नाही या बाबतचा अंतिम निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांचा राहिल.

१९ )वाहनास संगणकिय ओडोमीटर असणे आवश्यक आहे.

२० )वाहनाची फिरती प्रतिमहा २५०० किमी इतकी अपेक्षित आहे.

२१ )निधी उपलब्धेतेनूसार वाहनाची देयके अदा केली जातील.

२२ )वाहन पुरवठा दाराने निविदेमध्ये नमूद व उपलब्ध करुन दिलेलेच वाहन निविदा कालावधीकरीता उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. सामान्य परिस्थीतीमध्ये अन्य बदली वाहन स्विकारले जाणार नाही.

२३ )करारामध्ये उदभवणा-या कोणत्याही विवादास्पद मुदयांवर अतिंम निर्णय देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांना राहतील. कोणतेही कारण न देता प्रस्तूत करार रद्द करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांना राहिल.

२४ )वाहन पुरवठादार यांनी निवेदेमधील अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे करारपत्रक रक्कम रुपये १००/- च्या कोर्ट फी स्टॅम्पवर सादर करणे बंधनकारक आहे.

२५ )वाहनाची दुरुस्ती, टायर, टयुब, रिपेअरी, ऑईल बदली व इतर आवश्यक वाहनाचा खर्च हा सर्व वाहन पुरवठादाराने करावयाचा असुन त्याबाबत कोणताही खर्च / भरपाई देय राहणार नाही.

२६ ) वाहनाची फिरती प्रतिमहा २५०० किमी अपेक्षित आहे, सदर फिरतीवेळी अधिकारी यांनी वातानुकुलर (ए.सी.) लावणेची मागणी केलेस तो सुरु ठेवणे वाहन पुरवठादारास बंधनकारक राहील.

२७ ) वाहनाची फिरती – पुणे, मुंबई व इतर ठिकाणी शासकीय कामासाठी फिरती वेळी देय असणारा टोल (वाहतूक कर) हा या कार्यालयाकडून अदा करणेत येईल.

२८ ) सुरक्षा अनामत रक्कम ५,०००/- ही करारनामा करतेवेळी या कार्यालयाकडे राष्ट्रीयकृत बॅकेचे धनाकर्षव्दारे ( Demand Draft ) जिल्हा आरोग्य अधिकारी सांगली यांचे नांवे या कार्यालयाकडे जमा / भरणेची आहे.

२९ ) वाहनाची फिरती प्रतिमाह २५०० किमी अपेक्षित आहे, प्रतिमहा २५०० किमी पेक्षा जास्त फिरतीचे देयक या कार्यालयाकडून अदा केले जाणार नाही. तथापि, एखादया महिन्यात काही अपवादात्मक परिस्थितीत त्या महिन्यातील एकुण फिरती २५०० किमी पेक्षा जास्त झालेस वरील जादा वाहन फिरतीची देयके ही ई दरपत्रके मंजूर न्युनतम प्रतिकिलोमिटर दारानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी सांगली यांचे मंजुरी नुसार देयके अदा करणेत येतील, याबाबत कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद सांगली

Scanned with OKEN Scanner

## जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, सांगली

## लखोटा क्र. १ (कागदपत्रे) (तांत्रिक)

### पाकीट क्रं.१ मध्ये खालील कागदपत्रे समाविष्ठ करावीत

१) वाहनांच्या आर.सी.टी.सी./ कर पुस्तकाची साक्षांकित झेरॉक्स प्रत.

२) वाहनाचा केंद्रीय मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या तरतूदीनुसार परिवहन संवर्गातील म्हणजेच प्रवासी वाहतूक परवाना साक्षांकित झेरॉक्स प्रत.

३)वाहनाचा पूर्ण विमा भरलेच्या पॉलीशीची साक्षांकित झेरॉक्स प्रत.

४) वाहन चालकाचा वाहन चालविणेचा परवाना साक्षांकित झेरॉक्स प्रत.

५) अटी व शर्ती मान्य असलेबाबत अटी व शर्ती चे झेरॉक्स प्रत निविदाधारकांने स्वाक्षरीसह लखोटा क्र. १ मध्ये जोडणे बंधनकारक आहे.

Scanned with OKEN Scanner

# जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, सांगली

## लखोटा क्र. २ (आर्थिक)

## आर्थिक दर भरण्याचा नमूना खालीलप्रमाणे

| वाहनाचा प्रकार (कंपनीचे नाव) | वाहन नोंदणी क्रमांक व खरेदी दिनांक | वाहन पुरवठा दर |
|---|---|---|
| | | १) दरमहा २५०० किलोमिटर फिरती करिता इंधन, वाहनचालक, वाहन देखभाल दुरुस्तीसह ठोक रक्कम रुपये – ..................... <br><br> २) २५०० किलोमिटर वरील फिरती करिता इंधन, वाहनचालक, वाहन देखभाल दुरुस्तीसह प्रति किलोमिटर दर रुपये – ............... |

दिनांक :-

ठिकाण :-

वाहन पुरवठादार यांची स्वाक्षरी

संपुर्ण नाव :-

पत्ता :-

मोबाईल नंबर :-

Scanned with OKEN Scanner